नि.दि.दावा. क्र. १७/२०१५.
विशाल व इतर वि. रॉबर्ट व इतर.
MHKO150000932015.

## निशाणी क्रमांक १०२ ते १०५ वरील एकत्रीत आदेश.

वादींनी नि. क्र.१०२ वरील अर्ज मयत मूळ वादी क्र.४ च्या विरोधात झालेला अवसानाचा आदेश रद्द करण्यासाठी, नि. क्र.१०३ चा अर्ज त्याचे वारस पटलावरती घेण्यास झालेला विलंब माफ करण्यासह नि. क्र.१०४ प्रमाणे त्याचे वारस पटलावरती आणण्यासाठी दाखल केलेले आहेत. न्यायाच्या दृष्टीने चर्चेची पुनरावृत्ती टाळण्यासाठी सर्व अर्ज एकत्रीतपणे आदेशासाठी घेतलेले आहेत.

२. वादींचे थोडक्यात कथन की, दावा प्रलंबित असताना मूळ वादी क्र.४ चे दि. १४.११.२०२२ रोजी निधन झालेले असून त्यांना मुदतीमध्ये आवश्यक कागदपत्रे उपलब्ध न झाल्यामुळे सदर बाब वकिलांना मुदतीत सांगता आलेली नाही. त्यामुळे मयत मूळ वादी क्र.४ च्या विरोधात अवसानाचा आदेश झालेला असून त्याचे वारस पटलावरती आणणे गरजेचे आहे. सबब, त्यांनी दाव्यातील गुंतागुंत टाळण्यासाठी आणि अंतिम न्यायनिवाडयाच्या दृष्टीने मूळ वादी क्र.४ चे वारस अभिलेखावरती घेणे गरजेचे असल्यामुळे अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

३. प्रतिवादींच्या वकिलांनी नि. क्र.१०२ च्या अर्जाखाली एकत्रीत म्हणणे दाखल केले असून, वादींनी चुकीचे कारण नमूद केलेले असून जाणीवपूर्वक मयत मूळ वादी क्र.४ चे वारस विहित कालावधीमध्ये पटलावरती आणलेले नाहीत. सबब, अर्ज नामंजूर करण्याच्या मागणीसह न्यायाअंती योग्य तो आदेश करण्याची विनंती केली आहे.

४. वादी व प्रतिवादींच्या वकिलांचा विस्तृत युक्तिवाद ऐकला. वादीच्या वकिलांनी प्रस्तूत अर्जाद्वारे वादीने केलेली मागणी दाव्याच्या अंतिम न्यायनिर्णयास उपयुक्त असल्याने न्यायाच्या दृष्टीने अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे. प्रतिवादींच्या वकिलांनी प्रस्तूतचे अर्ज वादीने विलंबाने दाखल केले असून त्याचे कोणतेही संयुक्तिक कारण दिले नसल्यामुळे अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

५. वादींनी मयत मूळ वादी क्र.४ च्या मृत्यूपत्राची प्रत सादर केलेली आहे. सदर मृत्यूपत्राप्रमाणे मूळ वादी क्र.४ चा दि.१४.११.२०२२ रोजी मृत्यू झालेला आहे. प्रस्तूत दावा हा इतर प्रतिवादींच्या उपस्थितीसाठी प्रलंबित आहे. त्या दरम्यान मूळ वादी क्र.४ मयत झालेला असून त्याच्या वारसांना त्याच्या मृत्यूनंतर ९० दिवसांमध्ये किंवा त्यापुढे अतिरिक्त ६० दिवसांच्या विलंबाने पटलावरती आणणे गरजेचे होते. त्यामुळे झालेल्या विलंबाचा विचार करता, जरी अवसायानाचा आदेश करण्यात आलेला नसला तरी प्रस्तूत दावा हा मयत मूळ वादी क्र.४ साठी अवसानायात झालेला आहे.

६. वादीतर्फे अर्ज दाखल करण्यास झालेल्या विलंबा बाबत दिलेल्या कारणांचा विचार करता, ती योग्य व समर्पक वाटत नाहीत. परंतु, वादींची दाव्यातील मागणी विचारात घेता, प्रस्तूतचा दावा कायम मनाईसाठी दाखल केलेला असून मयत मूळ वादी क्र.४ च्या वारसांचे दावा मिळकतीशी हितसंबंध गुंतलेले असून त्यांना दाव्यात आवश्यक पक्षकार करणे गरजेचे आहे. वादींचा अर्ज मंजूर केल्यामुळे प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. सबब, न्यायाच्या दृष्टीने आवश्यक असलेल्या बाबींचा विचार करता मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे,

DISTRICT COURTS MAHARASHTRA सत्यमेव जयते

## आदेश

१. अर्ज एकत्रीतपणे ५००/– रुपये दंडाची रक्कम विधी सेवा समिती, आजरा यांच्याकडे जमा करण्याच्या अटीवरती मंजूर करण्यात येतात.

२. मयत मूळ वादी क्र.४ विरोधात झालेला अवसानाचा आदेश रद्द करण्यात येऊन वादींना त्याच्या वारसांना सदर दाव्यात मूळ वादी क्र.४/१ व ४/२ प्रमाणे समाविष्ट करण्याची परवानगी देण्यात येते.

३. मयत मूळ वादी क्र.४ चे वारस मूळ वादी क्र.४/१ व ४/२ प्रमाणे समाविष्ट झाल्यानंतर त्यांना नियमा प्रमाणे दाव्याच्या आदेशिका काढण्यात याव्यात.

४. प्रतिवादींना आवश्यकतेप्रमाणे त्यांच्या लेखी कैफियतीमध्ये नियमा प्रमाणे दुरुस्ती करण्यास सवलत आहे.

५. वादी व प्रतिवादींनी आदेशाची नोंद घेऊन पुर्तता करावी.

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

**(आर. पी. थोरे)**

जे. ओ. कोड–एम.एच.०२८९७

दिनांक – ३०.०९.२०२५. दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, आजरा.

DISTRICT COURTS MAHARASHTRA